अमर शिक्षण प्रसारक संस्था, मंगरूळपीर, जि.वाशिम.

द्वारा संचालित


श्री.वसंतराव नाईक कला व श्री.अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय, मंगरूळपीर, जि.वाशिम.



# अमरवाणी

२०१५-१६

अमर शिक्षण प्रसारक संस्था मंगरुळपीर जि वाशिम
द्वारा संचालित
श्री वसंतराव नाईक कला व श्री अमरसिंग नाईक वाणिज्य
महाविद्यालय, मंगरुळपीर जि वाशिम



# अमरवाणी

## २०१५-१६

# महाराष्ट्राचे थोर नेते



## श्री.वसंतरावजी नाईक साहेब


# आमचे भाग्य विधाता

## संस्थापक



## दानशूर श्री.अमरसिंग हरिचंद नाईक

आसोला खुर्द ता.मानोरा जि.वाशिम



मा. श्री. आत्माराम अमरसिंग राठोड

# — संपादकीय —

'अमरवाणी' हा वार्षिकांक वाचकांच्या हाती सुपूर्द करतांना अत्यानंद होत आहे. महाविद्यालयीन जीवनात अनेक जबाबदारीच्या रुपानं विविध प्रश्नांना, प्रसंगाना सामोरे जावे लागते. इतर सवयीप्रमाणे वाचन लेखनाची आवड विद्यार्थ्याच्या मनात निर्माण व्हावा हा त्यामागील प्रमाणिक हेतू त्यामुळे विद्यार्थ्याच्या चौकस बुध्दीला चालना मिळावी, त्याची सर्जनशीलता कार्यान्वित व्हावी व आजूबाजूच्या परिस्थितीचे सूक्ष्म अवलोकन करता यावे जेणे करुन तो विचारप्रवण होवून बऱ्या वाईट गोष्टी घडत असतात त्यातून चांगल्या वाईट विचारांचा अन्वयार्थ घेण्यांची मानसिक पातळी वाढीस लागावी महाविद्यालयात विविध उपक्रम राबवित असताना ज्या विद्यार्थ्यांनी आपल्यातील सुप्त कलागुणांचे प्रदर्शन केले आणि त्यांच्या गुणांना स्थान देण्यांचा प्रयत्न यावर्षी 'अमरवाणीने' जाणिवपूर्वक केला आहे.

महाविद्यालयाचा सर्वांगिन विकास घडवून आणण्याच्या प्रयत्नात असलेल्या दुर्दम्य आशावाद बाळगणाऱ्या, महत्वाकांक्षी, जिज्ञासू समाज उन्नतीची कास धरणाऱ्या प्रेमळ स्वभावाचे मा.आ.अ.राठोड साहेब यांच्या विचारसरणीला अनुरुप त्यांच्या कारकीर्दीत असंख्य खुणा महाविद्यालय मोठया अभिमानाने आपल्या अंगाखांद्यावर धारण करतांना दिसताहेत त्यांच्याच मार्गदर्शनाने व सहकार्याने 'अमरवाणी' वार्षिकांक आपल्या हाती देत आहोत.

या अंकाच्या पूर्ततेसाठी मा.आ.अ.राठोड साहेबांनी अतिशय मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य केले त्यांचे आभार मानण्या ऐवजी त्यांच्या ऋणातच आम्ही राहू इच्छितो.

ऋणनिर्देश

प्रा.डॉ.एस.ए.राठोड

टिप :— 'अमरवाणी' वार्षिकांक मधील लेख व कवितेतून व्यक्त झालेली मते सबंधिताची आहे

# मनोगत

मंगरुळपीर सारख्या ग्रामिण भागात अमर शिक्षण प्रसारक संस्थाने १९७१ साली श्री वसंतराव नाईक कला व श्री अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना केली. त्यामुळे ग्रामिण भागातील तरुण–तरुणीच्या शिक्षणात लक्षणिय वाढ होण्यांस मदत झाली बऱ्याच अंशी तरुणांच्या शिक्षणाचा मार्ग सुकर झाला. स्वातंत्र्योतर शिक्षणाचा प्रसार व प्रचाराचा वेग झपाटयाने वाढला ही बाब लक्षात घेऊन दानशूर श्री अमरसिंग नाईक यांनी ग्रामिण भागातील तरुणांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यांसाठी पुढाकार घेवून महाविद्यालय सुरु करण्यांसाठी सर्वोतपरी मदत केली. अमर शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव मा.आ.अ.राठोड साहेबांनी कठोर परिश्रम करुन ओसाड जमिनिवर हिरवळ निर्माण केली. आज या महाविद्यालयाचा परिसर वृक्षराजीनी बहरलेला आहे. महाविद्यालयाची स्वच्छता निटनीटकेपणा पाहूण बाहेरचा आलेला व्यक्ती मोहित होतो. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने सोयीचे असल्यामुळे तसेच महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरण पोषक असल्यामुळे प्रवेश घेण्यांसाठी रिघ लागलेली असते.

महाविद्यालयात रासेयोचे विद्यार्थ्याचे पथक आहे रासेयो च्या माध्यमातून विविध कार्यक्रमाचे नियोजन केल्या जाते. सांस्कृतीक कार्यक्रमातर्गत सुध्दा विविध कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते हे महाविद्यालय जरी ग्रामिण भागातले असले तरी खेळ व क्रिडाक्षेत्रात मागे नाही. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये सातत्याने सहभागी होत असते. खेळ व क्रिडा क्षेत्रातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यांसाठी त्यांचे कौतूक करण्यांसाठी मा.आ.अ.राठोड साहेब, संचालक मंडळ व महाविद्यालय मागे राहत नाही. महाविद्यालयाची निकालाची टक्केवारी चांगली राहत असल्यामुळे विद्यार्थ्यासाठी हे महाविद्यालय उत्कर्षाचे शिखर वाटते.

श्री वसंतराव नाईक कला व श्री अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय हे उत्कट ध्यासातून जन्माला आले असून या महाविद्यालयातील विद्यार्थी समाजाच्या विविध स्तरावर जावून स्वप्न साकार करतांना दिसतात. ग्रामिण भागातील मुला–मुलींना ज्ञानाचा प्रकाश दाखविणाऱ्या संस्थेचा कार्यकारी प्राचार्य या नात्याने मला अतिशय समाधान वाटते. या महाविद्यालयाची प्रगती उत्तरोत्तर होवो, अशी अपेक्षा करीत असताना मला मा.आ.अ.राठोड साहेब साहेब, संचालक मंडळ, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांचे वेळोवेळी सहकार्य लाभत आले. याचा आवर्जून उल्लेख करतांना आनंद वाटतो.

कार्यकारी प्राचार्य

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) आमचं कॉलेज | — | आकाश नारायण काळे, बी.ए.भाग— ३ |
| २) आसमानी कोप | — | रोहन ग. जाधव, बी.ए.भाग— ३ |
| ३) शेतकरी | — | रोहन ग. जाधव, बी.ए.भाग— ३ |
| ४) जीवन | — | दिनेश वासुदेव महिंद्रे बी.ए.भाग— २ |
| ५) प्रेम | — | रोहन ग. जाधव, बी.ए.भाग— ३ |
| ६) मुझ्या टपोर डोळयात | — | अजय राठोड, बी.ए.भाग— २ |
| ७) इथून दूर जातांना | — | गोकुळ प्रल्हाद कऱ्हे, बी.ए.भाग— ३ |
| ८) टंसनम व ज्पउम | — | गोकुळ प्रल्हाद कऱ्हे, बी.ए.भाग— ३ |
| ९) जे शक्य वाटत ते | — | विकास सुभाष कुरकुटे, बी.ए.भाग— २ |
| १०) जीवन | — | कु लक्ष्मी नामनोर, बी.ए.भाग— २ |
| ११) आयुष्य एक सफर | — | कु प्रगती ग महल्ले, बी.कॉम.भाग—३ |
| १२) आई | — | कु रेश्मा संजय म्हातारमारे, बी.ए.भाग— १ |
| १३) जीवन | — | कु रेश्मा संजय म्हातारमारे, बी.ए.भाग— १ |
| १४) परिवार | — | कु प्रिती रमेश राठोड, बी.ए.भाग— १ |
| १५) आम | — | कु प्रिती रमेश राठोड, बी.ए.भाग— १ |
| १६) पाऊस | — | कु प्रिती रमेश राठोड, बी.ए.भाग— १ |
| १७) जीवन | — | कु मनिषा पंजाबराव वानखडे, बी.ए.भाग— १ |
| १८) वडील | — | कु मनिषा पंजाबराव वानखडे, बी.ए.भाग— १ |
| १९) भाऊ माझा | — | कु मनिषा पंजाबराव वानखडे, बी.ए.भाग— १ |
| २०) जीवंत असतांना | — | कु मनिषा पंजाबराव वानखडे, बी.ए.भाग— १ |
| २१) श्रावण धारा | — | कु भारती दगडू मनवर, बी.ए.भाग— १ |
| २२) आई | — | कु भारती दगडू मनवर, बी.ए.भाग— १ |
| २३) मानवाची सावली | — | कु भारती दगडू मनवर, बी.ए.भाग— १ |
| २४) ममतेची छाया | — | कु पुजा किसन मनवर, बी.ए.भाग— १ |
| २५) मानव आहे तरी कुठ! | — | कु पुजा किसन मनवर, बी.ए.भाग— १ |
| २६) तृणाचा मित्र | — | कु माया रमेश ठोंबरे, बी.ए.भाग— १ |
| २७) आईचा स्वभाव | — | कु माया रमेश ठोंबरे, बी.ए.भाग— १ |
| २८) मन हे वेढे फुलपाखरु | — | कु शितल जावळे, बी.ए.भाग— १ |
| २९) दुरावणाऱ्या मैत्रीनी | — | कु शितल जावळे, बी.ए.भाग— १ |
| ३०) हे विश्व वेगळे | — | कु शितल जावळे, बी.ए.भाग— १ |
| ३१) कोणासाठी | — | गोकुळ दिलीप राठोड, बी.ए.भाग— ३ |
| ३२) महात्मा जोतिराव फुले यांचे शैक्षणिक कार्य | — | विशाल मनोहर ढेंगाळे, बी.ए.भाग— १ |
| ३३) विनोद | — | आकाश चव्हाण, बी.ए.भाग—१ |
| ३४) आजचा बेरोजगार तरुण | — | आकाश नारायण काळे, बी.ए.भाग— ३ |
| ३५) राष्ट्र संत तुकडोजी महारात यांचे सामाजिक कार्य | — | युक्तीवंत प्रकाश मनवर, बी.ए.भाग— १ |
| ३६) तरुणाई पुढील आव्हाणे | — | कु उषा म. वायले, बी.ए.भाग—३ |

# आमचं कॉलेज

व्ही.एन.आमची शान
सतत राबविते, कॉपीमुक्त अभियान
हीच आमची शान
आहे आमचे जिवनमान

व्ही.एन.आमच कॉलेज
देते आम्हाला नॉलेज
ज्ञानाचा संगम जिथे आहे
असं व्ही.एन.कॉलेज आमच आहे.

किती सांगाव कॉलेज आहे चांगलं
कधीही सांगत नाही वांगलं
करतात शिक्षक तिथे विद्यार्थ्यांच्या
वाईट गुणांवर हल्ला
आणि देतात आम्हाला मोलाचा सल्ला

व्ही.एन.कॉलेजचे विद्यार्थी
आहेत मोठया पदावर
बनले आहेत ते व्ही.एन. कॉलेजच्या नावावर

असे हे कॉलेज आहे अनमोल
ज्याचे नाही मोल
विद्यार्थी जिवनाचा
सांभाळून घेतो तोल
विसरु शकत नाही हे कॉलेज
जिथे मला मिळालं मोलाच नॉलेज
नोकरी मार्गदर्शन केंद्रे इथे
जावे लागत नाही जिथे–तिथे

ग्रंथालय आहे मोठे
पुस्तकाचे इथे खूप आहे साठे
ज्ञानाचा भंडार वाचून
सुधारतील विद्यार्थ्यांचे डोळे

कॉलेज आहे झकास
विद्यार्थ्यांचा होतो विकास
नाव माझ आकाश

आकाश नारायण काळे
बी.ए.भाग– ३

# आसमानी कोप

हेगामात उन्हाया
कुठरोक पाऊ
संवसाराच्या गाडयान
आलो नाकी नाऊ

येत नाही पाणी दुकाय
पडला कोरडा
वरडू वरडू माया भाऊ
कोरडा झाला नरडा
फुटल महा नशिबच का
दानोदान झाला भाऊ

कोटयात नाई गाय
कुठून आणू खत
कर्जाच्या बोज्याखाली
सडून रायली पत
वैतागली आता
डोयात आला जीऊ

औदा नाई पिकलं
त पुढच्या वर्षी पिकनं
या आशेवर शेतकरी
कुठंवर टिकन
आस्मानी कोपले
कुठवर भिऊ

ज्याने दिल शिर तोच शेर देईन
नशिबाच्या पूड कोन कसा काय घेईल
आशेचा किरन आपल्या मनामंदी लाऊ

जवरक हाय माया
कंबरीत जोर
जस होईन तस पाहून
घिनं म्होर
सार काई दिन पण
देणार नाई जिव

रोहन रा. जाधव
बी.ए.भाग– ३

रोहन ग जाधव
बी.ए.भाग– ३

# शेतकरी

असा कसा रे शेतकरी
कष्ट करावे लागते खूप
भारी–भारी
अंगाला चिंधुके गुंडाळते
तिची नारी
गरिबी का ऐवढी त्याच्याच दारी!!

सर्व जगाचे उदर भरी
मग तोच का उपाशी मरी
माझा बाप शेतकरी
साऱ्या जगाला तारी

असा कसा रे माझा बाप
त्याला का येत नाही राती झोप
त्याने काय केले रे पाप
कोन्या देवाने केला कोप

सारा जग राती झोपतो
अणवाणी पायाने तो शेतात फिरतो
रातभर जागूनी जागल करतो
तरीही त्याच्या पदरात काय उरतो

साहेबाला झोपेत येतो चेव
बायकोला म्हणतो उठून पंखा लाव
शेतकऱ्याले वाटत नाही का महालात राव
बंगल्यात आलीशान झोपाव

शेतकरी हा असाच असतो
श्रात्र–दिवस राब–राब राबतो
तूर, ज्वारी, गहू स्वत: पिकवतो
पण स्वत: चटणी भाकर खातो

शेतकऱ्याचा लेकरु विचारतो बापाशी
बा मला पुढच्या वर्षी शाळेत धाडशी
की दादा सारखी म्हशी चारायला लावशी

होऊनिया गेले किती हुतात्मा
आणखी होतील किती महात्मा
बंद कधी होतील शेतकरी आत्महत्या
सुखी शेतकऱ्याचा दिवस उगवेल कोणता

त्यांचा प्रश्न मांडतो कारे कोणी संसदेत
जोतो येतो अन् देतो शेतकऱ्याच्या डोळयावर लात
सरकार त्यांना देत नाही मदतीचा हात
यावर कधीतरी करील कारे शेतकरी मात!

रोहन ग जाधव
बी.ए.भाग– ३

# जीवन

जिवन हा प्रवास आहे
ध्येय हे स्टेशन आहे
रस्ता हा काटेरी आहे
तोच मी तुडवीत आहे

प्रत्येक क्षणाला प्रत्येक पावलाला
काटा हा बोचत आहे
पाय अगदी रक्ताळलेले
डोळे भरुन आलेले

असा हा माझा प्रवास आहे
तो एक वनवास आहे.
मात्र जिथे माझ स्टेशन आहे
तिथ अगदी कुलभाग आहे

जिवनात माझ आनंद आहे
काही तरी नवा अर्थ आहे

माणूसकी जागवायचा निर्धार आहे
आणि म्हणूनच लोकहो मी
जगत आहे! जगत आहे! जगत आहे.

दिनेश वासुदेव महिन्द्रे
बी.ए.भाग– २

# प्रेम

तिच्याशी मला झाला
होता प्रेम
तिच्याशी भेटीच्या
चूकत नव्हता नेम

ती सतत दिसायची डोळयात
तिच्यासाठी मी जायचो मळयात.

तिला बघितलं की मन तृप्त व्हायचं
तिच्यासाठी जेवनाला कधी कधी उशिर व्हायचं

वेगळाच वाटायचा तिचा सहवास
वाटायचा सतत हवा तिचा तोच वास

एके दिवशी आईने तिची गोष्ट काढली
कारे तुझी वेल कितीरे वाढली

अशी होती माझी दोडक्याची वेल
तिच्या पाणाला मी रोज लावत जायचो तेल

मित्रांनो नाते जुळवा निसर्गाशी
आपोआप सुख लाभेल तुम्हा सर्वांशी

रोहन ग जाधव
बी ए भाग– ३

# तुझ्या टपोर डोळयात

तुझ्या टपोर डोळयात, माझा इवलस गाव
तुझी झेप वादळाची, माझी तुझ्यावर घाव

तुला दुरुन पाहिलं, कधी झुरुन पाहिलं
तुझ डोळयातील रुप, हाती धरुन पाहिल

तुझा देह चंदनाचा, तुझी चांदण्याची काया
तुझा पदर उडतो, जणू आभाळाची माया

तुझ्या रुपाचा दरारा, जशी वाघीण चालली
सार शहारलं राणं, जशी नागीण चालली

तुझी चाल नागिणची, माझ थरारते मन
तुझा धरुन पदर, माझा भरारले मन

हाती लागेना किनारा, माझी चिखलात नाव
तुझ्या चिखलात नाव, तुझ्या टपोर डोळयात
माझं इवलस गावं

तुझं नखरेल नाक, मला छळे हाक हाक
काय सांगून फायदा, त्याचा तुझ्यावर धाक

तूझ नाक लय भारी, कांदे नाकाने सोलते
सार करुन नाकानं, वर नाकानं बोलते

किती लावायचं लोणी, किती माराण्या चकरा
माझी नाकीनऊ आले, तुझ्या नाकाचा नखरा

तशी प्रित माझ्या साठी, कधी दिसू दिली नाही
सखे नाकावर माशी, कधी बसू दिली नाही

तूझ्या फाजील नाकाला, लागे भारी मानपान
तूझ्या टपोर डोळयात, माझं इवलस गांव

अजय राठोड
बी.ए.भाग– २

# इथून दूर जातांना

इथून दूर जातांना
माझी आठवण तुमची असेल
तुमची आठवण माझी असेल
या साऱ्या आठवणीच
मनात उद्या गाव वसेल
इथून दूर जाताना

मी फक्त शब्दच मांगेल
प्रेमाचे असतील तर
त्या शब्दावर जगेल
इथून दूर जातांना

कालच जगण फार दाहक वाटतं
आजच जगणं फार नाहक वाटतं
पण तरीही उदयाचं जगणं
का मोहक वाटतं
इथून दूर जाताना

देण्यांसारख माझ्याजवळ
शब्दाशिवाय आहे तरी काय
आठवणीचेच शब्द हे
जणू दूधा वरची साय

गोकुळ प्रल्हाद कऱ्हे, बी.ए.भाग– ३

---

# जे अशक्य वाटते ते

स्वप्न मला पाहायचे आहे, ज्या शत्रूचा कोणी पराभव
करु शकत नाही, त्या शत्रूला मला हरवायचे आहे

कोणालाही सहन होत नाही ते सहन
मला करायचे आहे
ज्या ठिकाणी धाडशी माणसे
धावायचे प्रयत्न करत नाही
त्या ठिकाणी मला धावायचे आहे

ज्या वेळेला माझे बाहू थकलेले आहे, पाय
थकलेले आहे, हात थकलेले आहे,
शरीर थकलेले आहे.

समोर एवरेस्ट दिसतय त्या वेळेला माझ
एक–एक पाऊल त्या एवरेस्टया दिशेने
टाकायचे आहे. तो ताह मला गाठायचा आहे.

विकास सुभाष कुरकुटे
बी.ए.भाग– २

## जीवन

तू मला धाव दे जीवना
सोसण्या बाब दे जीवना

जात धर्माविना नांदते
मज असे गाव दे जीवना

रुप नसले तरी चालते
देखने भाव दे जीवना

सद्‌गुणांची माझ्या उरी
तेवढीच हाव दे जीवना

जिद्द माझी कुठे संपत्ती
नवा असा डाव दे जीवना

कु लक्ष्मी नामनोर
बी.ए.भाग– २

---

## आयुष्य एक सफर

आयुष्य एक सफर
सोडू जूने किनारे
नवे क्षितिज शोधाया
होऊ कोलंबस सारे

दया उधानलेला कसोटी हरेक प्रहर
एकवटूनी बळ सारे झुंजूया निरंतर

ताणू असे शिडाला की वादळ होईल ऊर्जा
थरातील लाटा पाहून मर्दांनी कलेजा
पार्थासम बाणू शिस्त, ध्येयावर डोका ठेऊ
कर्मयज्ञात दु:ख, दुर्गुणाची आहूती देऊ

नियोजन क्षणा क्षणाचे करु अपार कष्ट
समर्पूनी स्वत:ला गाठू एक–एक उध्दिष्ट

चेतवू सर्व अंतरीचे विस्तव निस्तेजले
वास्तवात साकारु जग तेजस्वी स्वप्नातले

कु प्रगती ग महल्ले
बी.कॉम.भाग– ३

# आई

आईची ती प्रेमळ माया
आई शिवाय कुठेही मिळणार नाही
एक जन्म घेतले तरी
आईचे ऋण फिटणार नाही

तुझ्यावर माझे प्रेम आहे
हे सिध्द करण्यांसाठी घराबाहेर पडले
पण मायेच्या मंमतेत जास्त
प्रेम होत म्हणून माघारी फिरले

आईची माया अथांग सागराप्रमाणे असते
ज्यांचा शेवट कधीही होत नसते
आईमूळे जिवनाला आकार मिळते
तिच्यामुळे जिवन साकार होते.

कु रेश्मा संतय म्हातारमारे
बी.ए.भाग— १

---

# जीवन

जीवन असते जगायचे
व्यर्थ नसते घालवायचे

संकट जरी आले तरी त्याला तोंड देऊन
जीवन असते फुलवायचे

जीवनात तर सुख दुःख येतच असत
त्याला आपण घाबरायच नसत

जीवन हे चांगले असते
ते सर्वांना हवेसे असते

जीवनाचे काहीना काही ध्येय असते
ते आपण साध्य करायचे असते

जीवनात आपण हरायचे नसते
कुठल्याही स्थीतीला घाबरायचे नसते

कु प्रिती रमेश राठोड
बी.ए.भाग— १च

# परिवार

जन्म जसे देते, तसे जीवनात सांभाळते
काही असेल परेशानी,
तर मार्गदर्शन करते

वागते असे बाबा, जसे असते आमचे मित्र
जीवन जगणे होईल सरळ
असे सांगते ते सूत्र

जीवनाच्या प्रत्येक वळणावर, सोबत असते माझा भाऊ
असेल काही सुख, दु:ख
तर सोबत आम्ही राहू

असेल लहान बहीण, तर असते सर्वांची लाडली
नसेल तिच्या जवळ प्रश्नाचे उत्तर
घेते त्याला ती सॅंडली

जसे अनेक फूल मिळून, बनते एक बगिचा
तसे रहावे सदैव सोबत आम्ही
हिच सर्वाची इच्छा!

कु प्रिती रमेश राठोड
बी.ए.भाग– १

# आम

तुझे देखके ऐ आम, आया मनमे ऐ सवाल
क्युँ आता तू एक मौसममे, इसपे होता है गवाल

हापूस, बदामी, कलमी, ऐसे अनेक तरे नाम
जब लेने जावो मार्केटमे, तब बढते है तेरे दाम

मिल जुलकर खाने मे, आता है तू हमे पसंद
जैसे अधुरा पान, बिना गुलकंद

एक मौसमे खाने की, जैसे होती हो परिक्षा
टाईमपर लेने जैसे, आती हो रीक्षा

कहावत है जैसे, आगे कुआँ पिच्छे खाई
वैसेही ही कहते है,
हर मौसमे आए तू मेरे भाई!

कु प्रिती रमेश राठोड
बी.ए.भाग– १

# पाऊस

पाणी वाहते—वाहते
मन हिरावून जाते
वाहत्या पाण्या बरोबर
सुखाचे अश्रूही वाहते

प्रती दिन तू यावे
असते सर्वांची ही आशा
नाही दर्शन तू दिले
सृष्टी होते सगळी निराशा

जशी पडते एक बुंद
तसे दूर होते दुःख
आला पाऊस भरभर
नाचे जसे रानं सुकं

मिळाले जसे धन
खुश होते रे पाखंडी
भरते डोह,
तसे होते सर्व आनंदी

कु प्रिती रमेश राठोड
बी.ए.भाग— १

---

# जीवन

जीवन काही वर्षाचे
वर्ष काही महिन्याचे
महिने काही आठवडयाचे
आठवडे काही दिवसाचे
दिवस काही तासांचे
तास काही मिनिटाचे
मिनिट काही सेकंदाचे
सेकंद काही क्षणाचे
या क्षणाचा सुयोग्य
वापर करुन घ्या
की जीवन हे तूमचेच !

कु.मनिषा पंजाबराव वानखडे
बी.ए.भाग— १

## वडील

वडीलांशी असलेले नात, खूप वेगळाच असतं

त्यांच्याशी कमी बोलणे, त्यांनी सांगीतलं ते करणं

आम्ही राहावं सुखात, म्हणून करतात मेहनत

त्यांना वाटतय की, खूप शिकाव आम्ही

त्यांच नाव कराव मोठ, हीच माझी 'मनिषा'!

कु मनिषा पंजाबराव वानखडे
बी.ए.भाग— १

---

## भाऊ माझा

भाऊ माझा धाकटा, तो सर्वांचा लाडका

बाबांची कष्टाळू वृत्ती, तशी करावी कृती

आई—बाबांच्या इच्छा, पूर्ण कराव्या ही शुभेच्छा!

जीवनात व्हावं यशस्वी, हिच माझी 'मनिषा'!

कु मनिषा पंजाबराव वानखडे
बी.ए.भाग— १

---

## जीवंत असतांना

खुप जपतो मापण स्वतःला, ते जीवंत असतानाच

खुप काही करायचं असेल तर, ते जीवंत असतानाच

दुखवू नये मने इतरांच, ते जीवंत असतानांच

कोणाला वततल कोणाला जींदो म्हणून टाका, ते जीवंत असतानाच

मनातील चांगल्या विचारांना, पंख फूटू दया
ते जीवंत असतानांच

जीवंतपणा हा किती दिवसाचा, हे जीवंतपणे ही कळत नाही....

कु मनिषा पंजाबराव वानखडे
बी.ए.भाग— १

# श्रावण धारा

काळोखले आभाळ सारे, कोसळल्या श्रावण धारा

आला श्रावण श्रावण, आनंदाला आले उधाण
हिरवा शालू हा पावसान, दिला धरतीला खूप छान

चौहीकडे दिसे आता, रंगबिरंगी फुले
आहे त्या शालूवरचे, नक्षीकाम जसे

भरभरुन शेतामध्ये, पिक झाले ऊभे
हे बघून शेतकरी, आनंदिले सारे

कु भारती दगडू मनवर
बी.ए.भाग– १

# आई

आई ही आई प्रेमाची सावली
आपल्या मुलांसाठी ती देवासंगे भांडली

दिव्या प्रमाणे ती नेहमी जवळ राहिली
परिवाराचा खांब बनून नेहमी उभी राहिली

आई ही आई साऱ्या विश्वाची मावली
आपल्या मुलासंगेती नेहमी प्रमानेच राहिली

सुर्याप्रमाणे नेहमी ती प्रकाश देत राहिली
कुटूंबाच्या हितासाठी नेहमी विचार करत राहीली

कु भारती दगडू मनवर
बी.ए.भाग– १

# मनवाची सावली

सोबत नेहमी असते, आपणा कळू देत नाही
फक्त काळोखा अंधारातच, ती लपून बसत असते

मोह नाही, माया नाही, तिला काहीच कळत नाही
आपल्या दु:खामध्ये व सुखामध्ये, तिच साथ देत असते

जेव्हा आपल्याला भिती वाटली, आपण तिलाच भिऊन जातो
व जेव्हा आपल्याला आनंद होतो, आपण तिथेच चित्रे बनवत असतो

कधी लांब तर कधी रुंद, कधी लहान तर कधी मोठी
अशी अनंक रुपे बदलून, ती आपल्याला हसवत असते

कु भारती दगडू मनवर
बी.ए.भाग– १

## ममतेची छाया

शब्द नाही तूला, आज वंदन कराया
तू आहेस ग आई, माझ्या ममतेची छाया

झाडाच्या सावलीप्रमाणे, अशी माया तुझी आहे ग आई
जीवनाच्या वाटेवरती कितीही, दु:ख आले तरी साथ तुझीच राहील

फूल तर सुंगधी आहेत
पण तुझ्या प्रेमाचा सुवास, माझ्या मनी आहे
मी कितीही रुसले तरी, प्रेमाचा हात तुझाच राहील

आयुष्यभराची शिदोरी
तू दिली आहेस मला
मरेपर्यंत मी पूरेल मला
श्रण आहे किती माझ्यावर भारी
या ऋणातच तूझ्या राहायंच गं आई
नही फिटणार तुझ्या ममतेची आहोळी

कु पुजा किसन मनवर
बी.ए.भाग– १

---

## मन आहे तरी कुठं

मन उधाण उधाण, फिरे वाऱ्याच्या जोरान
कधी इथं कधी तिथं, मन आहे तरी कुठं

समुद्राच्या लाटांशी, खेळावतो जोमान
उंच उंच उसळी, घ्यायला लावितो हे मन

डोंगरावर जाऊनी, झाडा–फुलात लपतो प्रेमाने
मजेत शिळ घालीत, सुटते हे मन

वरवर स्वप्नात जाऊनी, करी ढगांना गुदगुल्या
हळू हळू सैरावेरा, पळायला लावितो हे मन

असं हे मन आहे किती खटयाळ
मौजमजा करा खरा मंत्र हाच, बोलाया लाविते हे मन

कु पुजा किसन मनवर
बी.ए.भाग– १

# तृणाचा मित्र

गवताच्या पात्यावर, दवबिंदू पडले
जसे लहान मुल आईचे, कुशीत लपले

शोभून दिसते गवतावर दवबिंदू असे
राजमुकुटातील मोती जसे
तृणाचा हा पाहून साज, वृक्षालाही वाटली लाज

दवबिंदू शोभती त्यावर असे, गळयात घातले हार जसे

गवताचे हे रुप पाहूणी, पशू होती आकर्षित असे

कु.माया रमेश ठोंबरे
बी.ए.भाग– १

# आईचा स्वभाव

आईची माया जशी अथांग पाण्याप्रमाणे
आईची प्रतिमा जशी पशू–पक्षी प्रमाणे

आईने स्पर्श करताच वाटे मोक्ष मिळाले
आईने जवळ घेताच वाटे सुर्य–चंद्र एक झाले

ती आईच अमाय ममतेने वाढवते मुलाला
काय म्हणूनी पाठविले देवा तू धरतीला

देवा तू आईचे ह्रदय बनविले मऊ सायीचे
म्हणून तीचे मन हे गाणे गाते प्रेमाचे

मन हे तीचे मोकळे मन हे तीचे वेगळे
मनात तीच्या भीती नाही तर मनात तिच्या कलीक नाही

या पृथ्वीवर कोणी तिला म्हणती जगत माता
तर कोणी म्हणती जननी माता

ह्रदयात तिच्या ऐवढे दु:ख असे
पण चेहऱ्यावर मात्र हास्य दिसे

प्राण दिले तरी ऋण तिचे फिटणार नाही
माझ्या प्रत्येक श्वासात राहणार माझी आई

कु.माया रमेश ठोंबरे
बी.ए.भाग– १

## मन हे वेढे फुलपाखरु

कधी कळेना कुणा, मन हे वेढे फुलपाखरु

कधी इकडे कधी तिकडे, वाऱ्याच्या वेगाने उडते
कधी उंच श्वास घेतो, कधी रोखून श्वास धरतो

कधी श्रावणातूनी कधी उश्मातून, वेगवेगळे रंग घेऊनी वावरतो
कधी उडखडतो उंच उसळणाऱ्या, लाटामधुनी बेभान होऊनी उडतो

कधी दरी कधी डोगरातूनी, वाटेतील दु:ख सोसुनी उडतो
या डगमगणाऱ्या वाटेमधुन, उंच भरारी घेऊन जातो

कधी कळेना कुणा, मन हे वेढे फुलपाखरु

कु.शितल जावळे
बी.ए.भाग– १

---

## दुरावणाऱ्या मैत्रीणी

फुलावर फुलपाखरु जसे नाचे थुई थुई
माझ्या मैत्रीनीचे मन पिसाऱ्यावाणी फुलूनी जाई

वगळे जसे आकाशा मधुनी गिरकी घेती
मैत्रीनीचे प्रेम निराळे कधी न सोडे साथ
कमळा विना भूंगा न एकटा राही
मैत्रीणी विना मन हे जसे वेडे होई

नदितलं पाणी जस वर–वर जाई
मैत्रीनिची आठवण खोलवर रुजून राही
वारा प्रेमाचे साथ घेऊनी येई
पक्षी वेगवेगळे मंजूळ गाणी गाई

इंद्रधनुष्य प्रेमाचे सात रंग सांगून जाई
झरा हा नदीतून खुळ–खुळ वाही
शिळामधुनी मैत्रीनी हाक मारुनी जाई
फुलपाखरु मनाचे वेगवेगळे रंग पाई

गरजते ढग मैत्रीनीचे भास करुनी जाई
श्रावणातील पाण्याचे अनोखे आनंद होई
वाकडया–तिकडया कधी न विसावणाऱ्या वाटा
डोळयांच्या अश्रृची नदी भरुनी आडवी जाई

कु.शितल जावळे
बी.ए.भाग– १

# हे विश्व वेगळे

हे विश्व वेगळे मयुरा सारखे
मन हे निराळे दवबिंदू जसे

उंचतो अगन उंचाउन पाहे
ते पाहूनी मन हे माहून जाये

सळ–सळनारा तो वारा
सावळया त्या नागमोडी वाटा

विसावल्या त्या सागराच्या लाटा
उसळूनी जग हे वेगळे पाहे

त्या फुलाचे रुपाचे मन मोहून जाये, तो उंच गगन सुक्ष्म होऊनी पाहे

हे विश्व वेगळे मयुरा सारखे, मन हे निराळे दवबिंदू जसे

कु.शितल जावळे
बी.ए.भाग– १

---

# कोणासाठी

कोणासाठी रडता तुम्ही?
आला जमाना हसणाऱ्यांचा
मार्गदर्शक बनण्यापेक्षा, खडयात ढकलून देणाऱ्यांचा

कोणासाठी झगडता तुम्ही
आला जमाना बघणाऱ्यांचा
भांडण–तंटा सोडवण्यापेक्षा, लावालावी करणाऱ्यांचा

कोणासाठी उपाशी तुम्ही?
आला जमाना खाणाऱ्यांचा
भूकल्यांना चालण्यापेक्षा, भाकरी हिसकावून घेणाऱ्यांचा

समजून घ्या हेच तुम्ही
अज्ञान राहता आणखी कुठवर
देश विकास होणार नाही, असे दृष्ठ आहे जितवर

गोकुळ दिलीप राठोड
बी.ए.भाग– ३

# महात्मा ज्योतीराव फुले यांचे शैक्षणिक कार्य

महात्मा ज्योतीराव फुले यांचे मूळ घराणे सातारा जिल्हयातील कडगुण या गावाचे आणि त्यांचे उपगाव गोऱ्हे असे होते. गावाच्या पाटलांच्या सहकारी या नात्याने त्यांचा शेतकऱ्याच्या कुळाशी संबंध येत असे. योगायोगाने महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे अग्रदूत महात्मा ज्योतिराव फुले यांचा जन्म १८२७ साली पुण्यांत झाला. ज्योतिरावांचे वडील गोविंदराव हे सावतामाळी समाजातील होते. त्यांचा फुले विक्रीचा व्यवसाय होता. म्हणून त्यांना फुले या नावाने ओळखू लागले ज्योतीरावांच्या वयाच्या १३ व्या वर्षी म्हणजे १८४० मध्ये सातारा जिल्हयातील नायगांव येथील खंडाजी नेवसे पाटील यांची ९ वर्षाची कन्या सावित्री हिच्याशी झाला ज्योतीरावांना शिक्षणाचे महत्व मनोमनी पटल्यामुळे त्यांना आपली पत्नी सावित्री व मावस बहीण सगुणाबाई यांच्याही शिक्षणाची सोय करुन त्या दोघीनीही प्रशिक्षीत शिक्षीका बनविले सावित्रीबाईनी ज्योतीरावांना शैक्षणिक कार्यात विशेषत: स्त्रीयांच्या शिक्षणाच्या बाबतीत अनेक संकटांना तोंड देत त्यांनी निरंतर ज्योतीरावांना साथ दिली.

महात्मा ज्योतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी जे आज २१ व्या शतकात मुली ही कॉलेजात शिकतात हे त्यांना शिक्षण सत्यनारायणाच्या पोत्या वाचण्याकरिता वृत वैकल्य करण्याकरिता किंवा आपल्या पत्नीच्या लंबी आयुष्याची ईश्वराकडे प्रार्थना करीता दिलेले नसून ते त्यांना स्त्रीचे जगाला अस्तित्व दाखवून देण्याकरिता दिले आहे. महात्मा ज्योतीराव फुले यांना स्त्री शिक्षण हे अत्यंत मोलाचे आहे असे वाटत होते. आणि म्हणूनच त्यांनी आपल्या शैक्षणिक कार्याचा प्रारंभ स्त्री पासून म्हणजेच स्त्री शिक्षणापासून केला. गृहीणीला शिक्षणाचे पाठ प्रथम दिले म्हणजे कुटूंबात आपोआपच शिक्षणाचा प्रसार होईल, सारे कुटूंब शहाणे होईल असे फुले यांना वाटत होते. ते म्हणतात स्त्रीयांच्या शाळेचे प्रथम माझे लक्ष वेधले, पूर्ण विचारांनी माझे असे मत झाले की, पुरुषांच्या शाळेपेक्षा स्त्रीयांच्या शाळेची अधिक आवश्यकता आहे. स्त्रीया आपल्या मुलांना त्यांच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षी जे वळण लावतात त्यातच त्यांच्या शिक्षणाची खरी बीजे असतात. ज्योतिराव फुले यांनी अवघ्या २१ व्या वर्षी मुलींची पहिली शाळा पुण्यासारख्या सनातनी शहरात काढण्याचा धाडसी प्रयोग केला. हे खरच त्यांचे कौतूकास्पद होते. १८४८ साली सदाशिव गावंडे, सखाराम परांजपे, मोरो विठठल या जीवलग मित्राच्या साहाय्याने बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाडयात या मुलींच्या शाळेची पहिली घंटा वाजली सनातन लोकांनी त्यांना वाळीत टाकण्यांचा, अशा धमक्या ते त्यांना देत होते. दहशत दाखवत होते. पण ज्योतीरावांनी स्त्रीयांचा उध्दार करण्यांचा ध्वज खांद्यावर टाकूण निघालेले ज्योतिराव यामुळे खचून गेले नाहीत जेव्हा नविन शिक्षक त्या शाळेत मुलींना शिकवण्याकरिता यायचा तेव्हा त्याला सनातन लोक धमक्या देऊन पिटाळून लावायचे त्यामुळे एवढया थोर व्यक्तीनी त्या शाळेचे शिक्षक, शिपाईवाला झाडूवाला ही सर्व कामे स्वत: करावी लागत.

आजही आपण भारत हा 'पुरुष प्रधान संस्कृती' असलेला देश आहे म्हणतो आजसुध्दा समाजात जास्त मान हा पुरुषालाच मिळतो यांचे कारण शिक्षण ज्योतीराव म्हणतात.

'विद्येविना मतिगेली! मतिविना नीतीगेली
नितीविना गती गेली! गतिविना वित्त गेले
वित्तविना शुद्र खचले! इतके अर्थ एका
अविद्येने केले

फुले म्हणतात, स्त्रीयांना समाजात मान नाही यांचे मूळ कारण अडाणीपणा आहे. म्हणून प्रत्येक स्त्रीने फक्त शिक्षण घेतले पाहिजे आज कॉलेजमध्ये मुली फक्त हया टाईम पास करतात पण ते फक्त सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या मुळे ते आहे त्यांनी या संधीचं सोनं करायला हवं सावित्रीबाई फुले आणि ज्योतिराव फुले यांच्या स्त्रीला शिक्षण घेतांना आज आपण पाहतो. पहिली अंतराळीवर कल्पना चावला पहिली राष्ट्रपती प्रतिभा देविसिंग पाटील हया स्त्रीया आज पदावर त्यांची आदराने आपण नाव घेतले नसते 'स्त्री ही अबला नाही' आज प्रत्येक क्षेत्रात स्त्री पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून सोबत काम करत असल्याचे आपण पाहतो.

एवढे प्रचंड बदल हे फक्त विद्रयेमुळेच झाले आहेत. २८ नोव्हेंबर १८९० मध्ये त्यांचे निधन झाले अशा महापुरुषाला विनम्र अभिवादन!

श्री विशाल मनोहर ढेंगाळे
बी.ए.भाग– १

# विनोद

१) मुलगी :— तू काय काम करतेस
मुलगा :— लोकमत म.टा.अशा मोठमोठया न्यूज पेपरसाठी काम करायचो, पण आता ते काम मी सोडले
मुलगी :— अरे वेडा आहेस का?ऐवढे छान काम तू सोडलेस का सांग?
मुलगा :— जाऊ दे ग?
रोज सकाळी—सकाळी ५ वाजता उठून कोण दुसऱ्याच्या घरी पेपर नेवून टाकील

---

२) एकदा प्रेम आणि प्रवीन रात्रीचे फिरत होते.
प्रवीण :— अरे प्रेम किती वाजले असतील रे?
प्रेम एक दगड उचलतो आणि समोरच्या घरात मारतो...
त्या घरातून एक बाई बाहेर आली आणि बोलली,
'अरे नालायकांनो,
आता तरी झोपां जा.
रात्रीचे १२.१५ वाजलेत समजत नाही का?

---

३) ट्रेनमध्ये अचानक एक माणूस डब्बा घेऊन चढतो आणि मोठयाने ओरडतो.
खामोश : कुणीही आपल्या जागेवरुन उठायचा प्रयत्न करु नका....
सगळे प्रवासी घाबरुन गप्प होतात डबेवाला माणूस डब्बा उघडून कुल्फी बाहेर काढतो आणि म्हणतो, मी प्रत्येकाच्या जागेवर येऊन कुल्फी देईल.

---

४) यश म्हणजे काय???
१९८८ साली सचिन १० वी मध्ये नापास झाला.
२०१४ मध्ये १० वी च्या पुस्तकात पहिला धडा 'सचिन' वर असणार आहे.....!!!

---

५) आई :— प्रविन ..... बाळ का रडते बघ?
प्रविन :— काही नाही गं....... भूख लागली होती.
म्हणून मी त्याला मिर्ची खायला दिली.
अजून एक पाहिजे ....... म्हणून रडत असेल.

---

६) डॉक्टर :— सॉरी, पण तुमची किडणी फेल झाली आहे.
सोनोने आधी खूप वेळ रडतो नंतर
सोनोने :— (डोळे पुसत) पण किती मार्कांनी?

७) गुरुजी वर्गात सांगत होते

गुरुजी वर्गात सांगत होते की, छमूजवद रात्री कसा
रस्त्यावरील दिव्याच्या खाली अभ्यास करत असतो.

गुरुजी :— सोनोने लक्ष कुठे आहे......?

सोनोने :— गुरुजी मी विचार करत होतो जर छमूजवद रात्री दिव्याच्या खाली अभ्यास करत होता. मग सकाळी काय गोटया खेळत होता का?

---

८) आई :— प्रविण काय करतो आहेस?

प्रविण :— वाचत आहे

आई :— काय वाचत आहे?

प्रविण :— आई तुझ्या होणाऱ्या सुनेचे मॅसेजेस.

---

९) ७० वर्षाचे आजोबा.....

७० वर्षाच्या आजोबांनी आपल्या बायकोला विचारल.....
मी जेव्हा तरुण मुलींच्या मागे धावतो तेव्हा तूला वाईट वाटते का गं

१०) जय महाराष्ट्र......

जींकवा रे पून्हा तेच किल्ले शिवबाचे लढवा रे पून्हा तेच डोके रायबाचे
तुम्हीच उरला आता या हिंद प्रांताचे सजवा रे पून्हा रथ माझ्या शिवबाचे

आकाश चव्हाण
बी.ए.भाग— १

---

# आजचा बेरोजगार तरुण

आधुनिक काळ आणि प्राचीन काळ या २ काळात शिक्षण पध्दती वेगवेगळया असत. प्राचीन काळाचा विचार केला तर शिक्षण केवळ धार्मिकतेवर आधारीत होतो. परंतू आजच्या २१ व्या शतकात धार्मिक शिक्षण देत नाहीत. तर आजच्या या शिक्षणासोबत विद्यार्थी जीवन आणि आयुष्याची पुढील वाटचाल आणि संपूर्ण व्यवहार ज्ञान तसेच व्यक्तीच्या विकासासोबत त्याला रोजगार हा शिक्षण एकमेव देऊ शकतो. म्हणजेच नोकरी मिळते. परिणामी विद्यार्थ्यांच्या जीवणाचे कल्याण होते. पण आज मला सांगायच आहे की, आजच्या आधुनिक युगात स्पर्धा खूप वाढली आहे. विद्यार्थ्यांनि शालेय तसेच कॉलेजमध्ये जे शिक्षण घेतात ते नम्रतेन घ्यायला हवं असं माझ मत आहे.

आज रोजी स्पर्धा खूप वाढली आहे. या स्पर्धेत टिकायचं असेल तर आपल्याला खूप मेहनत घ्यावी लागते तरुणाविषयी बोलतांना मला असे वाटते की, लवकरात लवकर आपण रोजगार नोकरीच्या माध्यमातून मिळवायला हवा. खेळ पुस्तकी किडा न बनता बाहेरचे व्यवहार ज्ञान मिळविता आले पाहिजे आजचा तरुण आपल्याला Whats app, फेसबुक इत्यादी वर ऑनलाईन असतो तर मित्रहो जीवन जगायच असेल तर खूप मेहनत घ्यावी लागते. आपला विषय आजचा बेरोजगार तरुन आहे. आज रोजी बेरोजगारांची संख्या वाढत चालली आहे. कारण वाढती लोकसंख्या, वाढती बेकारी आणि आजचं स्पर्धात्मक युग यात टिकन फार कठीण आहे. शिक्षण घेतांना एक गोष्ट नेहमी लक्षात घ्यायला पाहीजे की,

आई वडीलांनी जीवनाच्या वाटेवर चालत असतांना शिक्षण रुपी नावाचा कंदिल आपल्या हाती दिला आणि सांगीतलं जो विद्यार्थी पायाने चालतो तो फक्त अंतर काठतो आणि जो विद्यार्थी आपल्या दृष्टीने चालतो तो आपल्या ध्येयापर्यंत पोहचतो हे निश्चित असते.

बेरोजगारपणा हे आपल्या भारतातील सर्वात मोठी समस्या आहे. पण असे मला सांगायच आहे. की, जोपर्यंत आपणाला रोजगार मिळवता येणार नाही. तोपर्यंत आपण सर्व बेरोजगार आहोत कारण आजची परिस्थिती लक्षात घेतली तर आपल्याला दिसून येते की, महागाई किती वाढली पुढे कुटुंबाची जबाबदारी आपल्यावर येते अशावेळी आपल्याला रोजगार मिळविता आला पाहिजे कारण आपल्या डोक्यात आणि शेतात काय पिकते यांच्यापेक्षा बाजारात काय विकते याकडे आज लक्ष दयायला हवं शिक्षण माणसाला आयुष्यभर कामी पडते या शिक्षणाचा अर्थ असा की,

शि—शिस्त

क्ष—क्षमता

ण— नम्रता

हे तीन गुण म्हणजे 'शिक्षण होय.

आज आपल्याला माहित आहे की, कोठेही एक जागा जरी असली तरी तिथे १०० फॉर्म येतात कधी १००० पण येऊ शकतात आता सांगा १००० मधुन आपली निवड होणं म्हणजेच अग्नी परिक्षाच होय. कॉलेजमध्ये शिकत असतांना तरुण प्रेमात पडतो आणि खर तर प्रेमात पडला की अभ्यासू वृत्ती कमी होते. माझ्या दृष्टीने प्रेम करायला हवं पण त्याचसोबत आपल कर्तव्य, आपल ध्येय आणि अभ्यास विसरायला नको.

शालेय जीवनात आपण त्रिकोण काटकोण शिकलो पण शिकलो नाही तो दृष्टीकोन आपला दृष्टीकोन चांगला पाहिजे कॉलेज जीवनात म्हणा किंवा तरुण वयात म्हणा प्रेम हे नेहमी दुसऱ्या क्रमांकावर असलं पाहिजे पहिल्या क्रमांकावर आपल ध्येय असल पाहिजे रोजगार मिळविण्यासाठी आपण स्पर्धा परिक्षेचे पुस्तक तसेच ॲकॅडमी किंवा आय.टि.आय. असा अभ्यास करायचा आणि रोजगार मिळवायचा मला इथे म्हणावस वाटते, My vision wailk are with foot me माझी दृष्टी ही नेहमी माझ्याबरोबर एक पाऊल पुढे असं प्रत्येक तरुणाला कळायला पाहिजे मी पण एक तरुण आहे. मित्रहो जीवन हे खूप खडतर आहे कारण व्यक्तीला अडचणी येतात आणि या अडचणीत व्यक्ती एवढा गुंतवून जातो की वेगवेगळे विचार त्यांच्या मनात येतात.

भारत हा विकसनशील देश आहे तो अमेरिकेप्रमाणे विकसित नाही अमेरिकेतील कोणताही तरुण असो तो बेरोजगार नाही तेथील सर्व तरुणांना रोजगार मिळतो. तसे मात्र आपल्या देशात नाही कारण आपल्या देशात सुशिक्षित बेकार, बेरोजगार आहेत. बेरोजगार असल्याची कारणे सांगायची झाली तर वाढती लोकसंख्या हे प्रमुख कारण आहे. भारतात रोजगार आहे पण फार अल्प प्रमाणात आहेत. काही तरुण नोकरीच्या माध्यमातून मिळवतात आजच्या तरुणाला फक्त नोकरी! छोकरी! और समाज मे प्रतिष्ठा! बस एवढच पाहिजे तर सांगायच तात्पर्य एवढ की नोकरी मिळवा तसेच समाजात चांगले स्थान, चांगल व्यक्तीमत्व घडवा.

कारण Ten Commenments do not make Ienstaein कोणीही दहा उपदेश दिले म्हणून आईन्स्टाईन सारखा तज्ञ होत नाही त्यामध्ये कसोटी आणि गरज असली पाहिजे कारण गरज ही शोधाची जननी आहे रोजगार हा नोकरी व्यवसाय, व्यापार इ. मार्गाने पण मिळू शकतो केवळ नोकरीच म्हणजे सर्वस्व नव्हे. आज बेरोजगारी विषयी म्हणावस वाटतं.

'जहा देखू वहा, इश्क के बिमार बैठे है!
हजारो मर गये, फिर भी लाखे तयार बैठे है!
बरबाद होते है ओ, लडकियो के पिछे!
और कहते है हम बेरोजगार बैठे है!

आकाश नारायण काळे
बी.ए.भाग— ३

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे सामाजिक कार्ये....

संत तुकडोजी महाराज हे 'राष्ट्रसंत' म्हणून ओळखले जातात अंधश्रध्दा, जातीभेदाच्या निमूर्लनासाठी त्यांनी भजनाचा किर्तनाचा प्रभाविपणे वापर केला. आत्मसंयमाने आणि विचार करुन ग्रामगीता हा उत्कृष्ठ ग्रंथ लिहला. त्यांनी मराठी हिन्दी भाषेतून काव्यरचना केली. संत तुकडोजी महाराजांनी १९३५ साली मोझरी येथे गुरुकुंज आश्रमाची स्थापना केली. 'खेजेरी भजन हा प्रकार त्यांच्या प्रबोधनाचे वैशिष्टे होती संत तुकडोजी महाराज हे आधुनिक काळातील महान संत होते विदर्भात त्यांचा विशेष संचार असला तरी महाराष्ट्र भर नव्हेच तर देशभर हिन्डून ते अध्यात्मिक सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन करित होते एवढेच नव्हे तर त्यांनी जपान सारख्या देशात जाऊन त्यांनी सर्वांना विश्वबंधूत्वाचा संदेश दिला.
सन १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांना अटक झाली होती. आते है नाथ हमारे ही त्यांची रचना तत्कालीन स्वांतत्र्य लढयासाठी स्फूर्ती गाण ठरले.

भारत हा खेडयापाडयांचा देश आहे. हे लक्षात घेवून खेडयांचा विकास झाला पाहिजे, खेडयाचा विकास झाला तर राष्ट्राचा विकास होईल अशी तुकडोजी महाराजांची श्रध्दा व विचार सरणी होती समाजातील सर्व घटकातील लोकांचा उध्दार कसा होईल. या विषयी त्यांनी अर्हिनिशा, चिंता केली ग्रामोन्नती व ग्रामकल्याण हा त्याच्या विचार सरणीचा जणू केंद्रबिंदूच होता त्यामुळे त्यांनी ग्रामविकासाच्या विविध समस्यांचा मुलस्वरुपी विचार केला व त्या समस्या कशा सोडविता येईल. याविषयी उपाय योजनाची त्यांनी सुचविल्या. त्या काळासाठी नव्हे तर आजच्या काळातही उपयुक्त ठरणाऱ्या आहेत हे आज तिव्रतेने जाणवते अशा गोष्टीतून राष्ट्रसंताचे दृष्टीकोण दिसून येतो.

अमरावती जवळील गुरुकुंज आश्रमाची स्थापना हे संत तुकडोजी महाराजांच्या आयुष्यातील लक्षणिय कार्य आहे. त्याचप्रमाणे ग्रामगीतेचे लेखन हाही त्यांच्या जीवनातील अत्यंत महत्वाचा भाग आहे. ग्रामगिता ही जणू तुकडोजी महाराजांची वाङ्‌मय पूर्तीच होय. खेडेगाव स्वयंपूर्ण व्हावे यासाठी जी उपाययोजना सूचविली आहे. ती अतिशय परिणामकारक ठरली. ग्राम हे सुरक्षित व्हावे, सुसंस्कृत व्हावे, ग्रामोद्योग संपन्न व्हावेत, गावानेच देशाच्या गरजा भागवाव्यात ग्रामोद्योगाना प्रोत्साहन मिळावे असा त्यांचा प्रयत्न होता त्याचे प्रतिबिंब ग्रामगीतेत उमटते आहे. देव भोळेपणा, जुनाट कालबाहय अंधश्रध्दा नाहीशा व्हाव्यात याविषयी त्यांनी अविरत प्रयत्न केले. सर्वधर्म समभाव हाही राष्ट्रसंताच्या विचारसरणीचा एक भाग होता त्यासाठी त्यांनी सर्वधर्मीय प्रार्थनाचा आग्रहपूर्वक पुरस्कार केला.

संत तुकडोजी महाराजांनी आपल्या विवेकनिष्ठ जीवनदृष्टीतून एकेधरवादाचा पुरस्कार करित असत. धार्मिक अनावश्यक कर्मकांडाला त्यांनी फाटा दिला होता. आयुष्याच्या शेवटपर्यंत त्यांनी आपल्या खेंजेरी भजनातून अध्यात्मिक, सामाजिक, राष्ट्रीय प्रबोधन केले. स्वातँय चळवळीच्या काळात ज्या चळवळी झाल्या त्यात भाग घेतला म्हणून त्यांना कारावासही भोगावा लागला अखिल भारतीय पातळीवर त्यांनी साधू संघटनेची स्थापना केली. गुरुकुंज आश्रमाची शाखोपशाखा स्थापना करुन त्यांनी शिस्तबध्द सामाजिक कार्यकर्त्यांची एक फळीच निर्माण केली. कुरुकुंजासी संबंधित असणारे हे सर्व निष्ठावंत कार्यकर्ते आजही त्यांचे कार्य अखंडपणे चालवित आहेत.

देशातील तरुण हे देशाचे भावी आधारस्तंभ आहेत ते बलोपासक असावेत म्हणजे ते समाजाचे व राष्ट्राचे संरक्षण करु शकतील ते नितिमान व सुसंस्कृत कसे होतील या विषयी ते उपदेश, मार्गदर्शन करित असत व्यसनाचा तिव्र विरोध व निषेध त्यांनी आपल्या लेखणीतून केला ऐहिक व पारलौकिक याचा सुंदर समन्वय त्यांनी आपल्या साहित्यातून केला त्यांनी मराठी प्रमाणे हिन्दी भाषेतून विपूल लेखन केले आजही त्यांचे साहित्य आपल्याला मार्गदर्शक ठरतात त्यांचे खंजेरी भजन एकूण तत्कालीन राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी संत तुकडोजी महाराजांना राष्ट्रसंत ही उपाधी बहाल केली. म्हणूनच आज ते राष्ट्रसंत म्हणून ओळखले जातात.

युक्तीवंत प्रकाश मनवर
बी.ए.भाग– १

# तरुणाई पुढील आव्हाने....

कुसुमाग्रज म्हणतात ''बहु असो तो सुंदर संपन्न की महाप्रिय आमचा एक महाराष्ट्र देश हा''

महाराष्ट्र रांगडा आहे, रसिक आहे, झुंजार आहे आणि भाविक आहे. मराठी मातीचा अभिमाना बरोबर इथे साऱ्या देशाची चिंता आहे. ऐशआराम आणि मिजास यांच्यापेक्षा तो साधेपणा आणि नैतिकतेचे सत्व सांभाळणारा आहे. आमचा देश तत्वासाठी भांडतो. जीवनमुल्य जपण्यासाठी निकराने झुंजतो, अशा या सुजलम सुफलम देशात आम्ही जन्माला आलोत आमच्या तरुणाई समोरची आव्हाणे नेमकी कोणती असावी?

प्रथमत: तरुण म्हणजे काय? हे समजवून घेणं आज अगदी निकटचं झालेल आपल्याला दिसून येत आहे ' भारत हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो' भारतात ४८ टक्के तरुण तर ५२ टक्के मध्ये बालक आणि वृध्दांचा समावेश आहे म्हणून या आर्यावर्त देशाला तरुणांचा देश म्हटल्या गेले आहे.

तरुण म्हणजे काय? विचार आणि कार्यशक्ती या दोघांचा सुंदर मिलाफ म्हणजे तरुण स्वामी विवेकानंद म्हणतात, तरुण हा वायुसम गतीशिल असावा. संसाररुपी महासागरातून तरुण जाण्याची क्षमता ज्यांच्या अंगी आहे असा हा तरुण ज्याला बुडणे माहित नाही, ज्याला फक्त जिंकणे आणि जिंकणेच माहित आहे. सत्य शिव सुंदरतेचा मिलाफ म्हणजे तरुण शक्ती भक्ती युक्तीचा संगम म्हणजे तरुण प्रेरणा जिद्द महत्वांकाक्षेचा उगम म्हणजे तरुण! असा हा तरुण.

भारतासारख्या परमपवित्र सनातनवादी देशाचे आपण तरुण आहोत आपली स्वप्ने काय असली पाहिजे, आपली आव्हाणे कोणती असली पाहिजे 'युवाशक्ती' ही देशाची एकमेव खरी संपत्ती आहे. म्हणून आपल्या समोरची आदर्श व्यक्ती आव्हाने ही डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, भगतसिंग, राजगुरु, चंद्रशेखर आझाद असायला पाहिजे.

स्वामी विवेकानंद म्हणतात, युवकांनी वाईटाचा स्विकार टाळला पाहिजे, म्हणूनच स्वामीजी म्हणतात 'सर्व प्रकारचे सामर्थ तुमच्यात वसत आहे तुम्ही सर्व काही करु शकता यावर विश्वास ठेवा आपण दुर्बल आहोत असे कधीही समजू नका म्हणूनच म्हटल्या जाते. उठ तरुण जागा हो! स्वामी विवेकानंदाच्या जीवनाचा धागा हो! परंतू आज आमच्या तरुणाईच होतंय काय आजची तरुणाई चांगल्या विचारापासून दूर चालली आणि व्यसनाच्या आधीन होत चालली आहे. जास्तीत जास्त वाईट गोष्ट स्वीकारण्यांचा, आत्मसात करण्यांचा प्रयास करत आहे. आजची तरुणाई सुशिक्षीत असूनही बेरोजगार व व्यसनाधीन झालेली आहे. आपण काय करतो लाखमोलाचा अनमोल देह व्यासनापायी नाशिवंत करतो, आपल सुंदर आयुष्य व्यासनापायी धुळीला मिळवतो, सुंदर जगणं नेस्तानाभूत करतो.

इतकेच नव्हे तर फॅशन आणि पाश्चिमात्यिकरणाचा अवलंब जास्त प्रमाणात करत आहोत. भारत हा ज्ञानाने संस्कृतीने समृध्द असा देश आहे आणि त्या देशाचे आपण नागरीक आहोत, हा देश आपल्यावर अवलंबून आहे. ही आपल्याला कल्पना असणे अत्यंत गरजेचे आहे. आपल्या थोर महात्म्यांनी आपल्यासाठी मातृभूमिवर लढता–लढता रक्त भांडवल प्राणांच्या आहुत्या दिल्या पण आजची तरुणाई काय करत आहे. खरचं कोण स्वीकारील आपला आदर्श? कशी होईल देशाची प्रगती संत तुकाराम आपल्याला सांगून गेले, ''आम्ही बी घडलो, तुम्ही बी घडाना'' हा बी कुठे लावायाचा ते आपल्यावर अवलंबून आहे. आजची तरुणाई नानाप्रकारचे गुटखे, मद्यपान सेवन करुन पिचकाऱ्या मारतो. ही मातृभूमी स्वातंत्र्य करण्यांसाठी ज्या विर भगतसिंगाने आहूती दिली पण ज्या मातीन आपल्याला खेळवलं, चालायला शिकवलं एक समृध्द जीवन दिलं तिच्यावर आपण पिचकाऱ्या मारतो.

एके ठिकाणी गायक आनंद शिंदे म्हणतात
''आझादी की कभी शाम ना होने देंगे''
सदियो की कुर्बानी यु हि निलाम ना होने देंगे
बची हो एक भी बूंद लहूँ की, तबतक भारत
माता का ऑचल , यु हि निलाम ना होने देंगे!

आपल्या तरुणाई समोरची आव्हाने आपल्या मातृभूमिचे रक्षण करणे, प्रत्येक नारी जातीला आई समान पाहणे आपली संस्कृती जपणे, सामाजिक, राजकिय व आर्थिक बाबींचा विचार करणे आज महत्वाचे आहे. संत गाडगे बाबा, संत तुकडोजी महाराज, संत तुकाराम महाराज यांचे विचार आत्मसात करण्यांची खूप गरज आहे. कारण विचारच माणसाला घडवत असतात.

म्हणूनच आजच्या तरुणांनी जागृत असले पाहिजे देशाची चिंता असली पाहिजे, समाजाविषयी मनामध्ये कळकळ असली पाहिजे. तसेच न्यायाची चाड व अन्यायाची चिड असली पाहिजे, देशासाठी प्राण दयायची तयारी असली पाहिजे तरुणामध्ये तत्वरता, तन्मयता, तपस्विता हे तीन गुण असले पाहिजे आणि चांगल्या गोष्टीसाठी तो झटला पाहिजे.

वस्तू सुंदर आहे परंतू आपण त्या वस्तूकडे कसं पाहतो यावर ते सौंदर्य अवलंबून असते ' जिथे लाथ मारेल तिथे पाणी काढण्यांची तागद' त्या युवकात असली पाहिजे. उठा जागे व्हा! ध्येय प्राप्त झाल्याशिवाय थांबू नका.

कु.उषा म.वायले, बी.ए.भाग– ३





अमर शिक्षण प्रसारक संस्था, मंगरूळपीर, जि.वाशिम.
द्वारा संचालित
श्री.वसंतराव नाईक कला व श्री.अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय, मंगरूळपीर, जि.वाशिम.

Takwale-9422939936 / 37